एस.सी.सी. क्र.२६९/२०२५
सरकार विरुध्द संतोष
निशाणी क्र.१२ खाली

सरकार तर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची जबानी
मी प्रतिज्ञा पुर्वक निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | - शिवाजी गुंडू कुंभार, |
| वय | - ३९ वर्ष |
| धंदा | - मजुरी |
| राहणार | - जेवळी उत्तर, ता. लोहारा, जि. धाराशिव. |

सरतपास सरकार तर्फे श्री**.**एस**.**व्ही**.**काळे**,** सहाय्यक सरकारी वकिल यांचे मार्फत

१. पोलीसांनी मला पंचनामा करण्यासाठी बोलवले नव्हते. पोलिसांनी माझ्यासमक्ष पंचनामा केला नाही, तसेच काही जप्त केले नाही. आता मला दिनांक २६.१०.२०२५ रोजीचा जप्ती पंचनामा दाखवला, त्यातील मजकुर मला माहिती नाही, त्यावर माझी अनुक्रमांक १ वर सही आहे, साक्षीदाराने पंचनाम्यावरील त्याची सही मान्य केल्यामुळे, सहीस निशाणी क्र**.**१३ देण्यात येते.

साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली**.** परवानगी देण्यात आली.

२. हे म्हणने खरे नाही की, दिनांक २६.१०.२०२५ रोजी पोलिसांनी मला जेवळी उत्तर येथील आरोपीच्या राहते घरासमोरील मोकळया जागेत बोलविले होते व त्यावेळी माझेसोबत दुसरे पंच संतोष शिंदे होते. हे म्हणने खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष एक निळया रंगाचे प्लॅस्टीकचे ६० लिटर क्षमतेचे बॅरल ज्यामध्ये आंबट उग्रवास येत असलेली गावठी हातभट्टी दारू अंदाजे ४८ लिटर जप्त केली व त्यातुन बॉटल सी. ए. तपासणी कामी एका १८० एम.एल.च्या काचेच्या बाटलीमध्ये जप्त मुद्देमालाती नमुना घेण्यात आला, त्यावर माझी व इतर पंच, पोलिसांच्या सहीचे लेबल लावुन लाकसिल केले, तसेच उर्वरीत मुद्देमाल जागेवरती नष्ट केला. हे म्हणणे खरे नाही की, त्याप्रमाणे जप्ती पंचनामा केला व तो मला वाचुन दाखवला व त्यावर माझी सही केली. आरोपी हा माझे गावातील आहे व माझे ओळखीचा आहे. हे म्हणने खरे नाही की, आरोपीला मदत व्हावी म्हणुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.
उलटतपास आरोपीतर्फे अँड**. ए.ए. कुलकर्णी** यांच्या मार्फत
नाकारला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

GAJANAN BHAGORAO JANKAR
Digitally signed by GAJANAN BHAGORAO JANKAR
Date: 2026.07.08 16:42:08 +0530

(गजानन बी. जानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, लोहारा

दिनांकः ०८.०७.२०२६